# जनसंपर्क विभाग

## विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र प्रशाळेतर्फे नेट - सेट - पेट कार्यशाळा

जळगाव, दि.७ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील माध्यमशास्त्र प्रशाळेतर्फे दि. २२ ते २४ फेब्रुवारी २०२३ रोजी विद्यापीठाच्या सोशल सायन्स प्रशाळेच्या सभागृहात नेट, सेट आणि पेट परीक्षेच्या पहिल्या पेपरकरिता राज्यस्तरीय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यशाळेचे उद्घाटन दि. २२फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरु प्रा.ए.टी.इंगळे उपस्थित राहणार आहेत. ही कार्यशाळा दि. २२ ते २४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी ५ या वेळेत आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेत प्रा.डॉ. कमलाकर पायस (तक्षशिला महाविद्यालय, अमरावती), प्रा.डॉ राजेश बोबडे (शामप्रसाद मुखर्जी महाविद्यालय शेंदूरजनाघाट, वरूड, जि.अमरावती), डॉ.प्रा.पल्लवी इंगोले (वसंतराव नाईक महाविद्यालय, धारणी, जि.अमरावती), प्रा.डॉ. रविंद्र पाटील (या. द. व. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,तिवसा, जि.अमरावती) हे मार्गदर्शन करतील. कार्यशाळेचा समारोप दि. २४ रोजी दुपारी ४.३० वाजता होणार असून समारोपाला प्रमुख पाहूणे म्हणून कुलसचिव डॉ.विनोद पाटील, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील उपस्थित राहणार आहेत.

ही कार्यशाळा सेट व नेट परीक्षेच्या पेपर क्र. १ वर आधारीत असून पीएच. डी. पूर्व प्रवेश (पेट) परीक्षेसाठी देखील उपयुक्त आहे. कार्यशाळेसाठी विद्यार्थ्यांना प्रवेश शुल्क १५०० रुपये असून जर निवासी सहभाग नोंदवायचा असेल तर रु. ५००/- अतिरिक्त द्यावयाचे आहे. तीन दिवस चहा - नाश्ता, दुपारचे जेवण अशी व्यवस्था करण्यात आली आहे. ज्या सहभागींना निवास व्यवस्था हवी असेल त्यांनी सहभाग पत्रामध्ये तसे नमूद करावे. सहभागासाठी http://tiny.cc/Form_NET_SET_PET या लिंकवर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी माध्यमशास्त्र प्रशाळा मोबाईल क्रमांक ८४०७९२२४०४ वर संपर्क साधावा असे आवाहन कार्यशाळेचे मुख्य संयोजक संचालक प्रा.डॉ.सुधीर भटकर, सहसंयोजक डॉ.गोपी सोरडे, डॉ.सोमनाथ वडनेरे, डॉ.रोहित कसबे यांनी केले आहे.

### बातमी नं. २

## जलनेती व वमनधौती प्रशिक्षण कार्यशाळा

जळगाव, दि.७ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील योग मार्गदर्शन केंद्राच्या वतीने योगायुर्वेद थेरपी अंतर्गत आयोजित जलनेती व वमनधौती प्रशिक्षण कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद मिळाला.

या कार्यशाळेत २१ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष तर ११ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने सक्रीय सहभाग नोंदविला. जलनेती ही उर्ध्वजतृगत म्हणजे खांद्याच्या वरील भागातील व्याधींमध्ये अर्थात वारंवार सर्दीचा त्रास होणे सतत होणाऱ्या डोकेदुखीचा त्रास, चक्कर येणे, मायग्रेन (अर्धशिशी) यावर उपयुक्त. तसेच जलनेती सोबतच वमनधौती चेही प्रशिक्षण देण्यात आले. वमनधौती ही शरीरातील अतिरिक्त कफ बाहेर टाकण्यासाठी, तसेच पचनाच्या सर्व तक्रारी (आंबट-करपट ढेकर येणे, छातीत आणि पोटात आगआग होणे, अपचन होणे, पोट साफ न होणे ई.) दूर करण्यासाठी मदत करते. विशिष्ट पद्धतीने वमनधौती योगमार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाखाली केल्यास

# जनसंपर्क विभाग

शरीरातील अतिरक्त चरबी कमी करण्यासाठीही उपयुक्त आहे. हे प्रशिक्षण योग मार्गदर्शन प्रमुख इंजि. राजेश पाटील व डॉ. लीना चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले.

## बातमी नं. ३

जळगाव, दि.७ (प्रतिनिधी ) : भारतरत्न गानसरस्वती लता मंगेशकर यांच्या प्रथम स्मृती दिनानिमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ परफॉर्मिंग आर्टस् ॲण्ड फाईन आर्टस (संगीत विभाग) स्वर सुमनांजली हा कार्यक्रम सोमवारी आयोजित करण्यात आला.

लता मंगेशकर यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून प्रतिमा पूजन करण्यात आले. विभागातील विद्यार्थ्यांनी लता मंगेशकर यांची गाणी सादर केली. कार्यक्रमासाठी संगीत विभागाचे प्रा. अलका चव्हाण, प्रा. प्रिया महाले, प्रा. तेजस मराठे तसेच मानसशास्त्र विभागाच्या प्रा. वीणा महाजन आणि राजेंद्र महाले व विद्यार्थी उपस्थित होते.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: ७ फेब्रुवारी, २०२३

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी